रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

पदव्युत्तर भूगोल विभाग

# डॉ. अरुण मोटघरे महाविद्यालय

## कोंढा-कोसरा ता. पवनी जि. भंडारा

सत्र २०२०-२१

## लघुशोध निबंध

-: विषय :-

पवनी तालुक्यातील कृषी विकासात स्त्रियांची भुमिका

-: सादरकर्ती :-

**कु. कल्याणी मनोहर बोरकर**

एम. ए. भाग २ (भूगोल)

-: मार्गदर्शक :-

प्रा. सचिन राऊत सर

डॉ. अरुण मोटघरे महाविद्यालय

कोंढा-कोसरा

-: भूगोल विभाग प्रमुख :-

प्रा. डॉ. प्रशांत बुराडे सर

डॉ. अरुण मोटघरे महाविद्यालय

कोंढा-कोसरा

रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर एम. ए. भाग २ च्या

२०२०-२१ भूगोल प्रात्यक्षिक परीक्षेकरिता प्रस्तुत

# CERTIFACATE

## Post Graduate Department of Geography

## DR. ARUN MOTGHARE COLLEGE

## KONDHA-KOSRA, DIST.-BHANDARA

*This is to certify that,* Ku. Kalyani M. Borkar *of* M.A. Part-II (Geo.) *is a bonafied student of* Dr. Arun Motghare College Kondha-Kosra *during the academic session 2020-21.*

*He has completed his short research paper for the submission to* R. T. M. Nagpur University, Nagpur *Geography Practical Examination Summer 2020-21.*

*Under the supervision of Prof.* Dr. Prashant Burade Sir

*Date :*

Head

Post Graduate Geography Department

Dr. Arun Motghare College Kondha-Kosra

Ta. Pauni Dist.-Bhandara

R. T. M. Nagpur University, Nagpur

# "GEOGRAPHY PRACTICAL EXAMINATION"

SUMMER – 2020-2021

NAME OF THE STUDENT

Ku. Kalyani Manohar Borkar

M.A.II (Geography)

PRACTICAL – IV SEMESTER

EXAMINED

INTERNAL EXAMINER

EXTERNAL EXAMINAR

R. T. M. NAGPUR UNIVERSITY, NAGPUR

# मनोगत

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठ नागपूर अंतर्गत एम. ए. भाग - २ (भूगोल) च्या अभ्यासक्रमानूसार कृषी भूगोलावर आधारीत एक लघूशोध निबंध सादर करावयाचा असतो. भंडारा जिल्हयातील "पवनी तालूक्यातील कृषी विकासात स्त्रियांची भुमिका" या विषयावर प्रस्तूत लघूशोध निबंध सादर करीत आहे.

भूगोल विषयाची आवड , भौगोलिक प्रवास, भूगोल चर्चासत्रामधील संवाद आणि विविध संदर्भग्रंथ यांचा आधार घेवूनहा लघुशोध निबंध तयार करण्यात आला आहे. या लघुशोध निबंधाचे आकलन सुलभ व सोपे व्हावे म्हणून नकाशे,आकृत्या , तक्ते व विविध शास्त्राचा पध्दतीच्या अत्यंत व सोप्या व सरळ भाषेत मी आदरपूर्वक प्रयत्न केला आहे.

हा लघुशोध निबंध माझे हितचिंतक आदरनीय प्रा. सचिन राऊत सर यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेला आहे. विषयाची मांडणी, माहिती व प्रोत्साहीत करण्यात आला सिंहाचा वाटा आहे. त्यामुळे मी त्यांचा मनस्वी आभारी आहे. तसेच पदव्युत्तर भूगोल विभागात कार्यरत असलेले भूगोलि विभागाचे प्रमुख प्रा. डॉ.प्रशांत बुराडे या सर्वाची मदत मिळाली. त्याबददल मी त्यांचा मनस्वी आभारी आहे.

त्याचप्रमाणे माझे वर्ग मित्र तसेच इतर सहकारी मित्र. सर्वात महत्वाचे म्हणजे मी सदैव शिक्षण घेत राहावे म्हणून सदैव माझ पाठीशी उभे असणारे माझे आई वडील यांचा मी ऋणी आहे.

या सर्व मंडळी सहार्याने मी हा लघुशोध निबंध सादर करीत आहे.

सादरकर्ती


कु. कल्याणी मनोहर बोरकर
एम. ए. भाग - २ (भूगोल)
डॉ. अरुण मोटघरे महाविद्यालय
कोंढा-कोसरा

# अनुक्रमणिका


प्रकरण १ ला : सामान्य घटक

- प्रस्तावना
- लघुशोध निबंधाचा उद्देश
- अभ्यास पध्दती
- संशोधनाची साधने
- प्रदेशाची निवड

प्रकरण २ रे :पवनी तालुक्यातील भौगोलिक पार्श्वभूमी

- पवनी तालुक्याचे स्थान व विस्तार
- भूमीस्वरूप
- नदिप्रणाली
- हवामान
  - अ) तापमान
  - ब) पर्जन्य

प्रकरण ३ रे : जलसाधन संपत्ती व जलसिंचन

- जलसिंचनाचे महत्व व साधने
- पाणीपुरवठा
- विविध साधने
- विविध पिकाखालील क्षेत्र

**प्रकरण ४ थे : लोकसंख्येचे वितरण**

- लोकसंख्येचे सर्वसामान्य वितरण
- लोकसंख्येचे व्यवसायानूसार वर्गीकरण
- शेती व्यवसायातील लोकसंख्या वितरण

**प्रकरण ५ वे : शेतात स्त्रियांचा सहभाग**

- वयोगटानूसार शेतात सहभाग असणाऱ्या स्त्रियांचे वर्गीकरण
- कामाच्या स्वरूपानूसार वर्गीकरण
- कामाच्या दिवसानूसार स्त्रियांचे वर्गीकरण

**प्रकरण ६ वे : निष्कर्ष व उपाययोजना**

- निष्कर्ष
- उपाययोजना

**संदर्भग्रंथ सूची**

प्रकरण पहिले

# सामान्य घटक

# प्रकरण पहिले

# सामान्य घटक

## १.१) प्रस्तावणा:—

प्रस्तूत लघूशोध निंबध हा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानूसार एम. ए. अंतिम वर्ष भुगोल अभ्यासक्रमात कृषी भूगोल या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार कृषी भूगोलाचा एक अभ्यास म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. या लघूशोध निबंधा अंतर्गत "पवनी तालूक्यातील कृषी विकासात स्त्रियांची भुमिका" हा विषय लघूशोध निंबधाकरिता निवडलेला आहे. या मागील उद्‌देश व्यवसायाकरिता जागृती होऊन ज्ञान वृध्दीगत करणे होय.

भारत हा कृषीप्रधान देश आहे. आणि त्यातील जवळपास ७० टक्के लोक हे कृषी व्यवसायात गुंतलेले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत ४८ टक्के उत्पादन हे कृषीव्यवसायातूनच उपलब्ध होतात. मात्र एवढे उत्पादन कमी पडत असल्यामूळे भारत सरकारने कृषी विकासातील प्रगतीसाठी काही उपययोजना व त्या अनुषंगाने काही अंतर्गत पावले सुध्दा उचलली आहेत.

कृषी व्यवसायामध्ये स्त्रियांची भूमीका किती प्रमाणात आहे आणि त्या पुरूषाप्रमाणेच कृषी विकासामध्ये त्यांची भूमीका बजावतांना दिसतात. आणि त्या आपला आर्थिक दर्जा उंचावण्यासाठी किती प्रयत्न करतात याचा आढावा घेण्याच्या दृष्टिकोनातून प्रस्तूत लघूशोध निबंधात अल्पसा प्रयत्न केलेला आहे.

त्याचप्रमाणे पवनी तालूक्यातील कृषी विकासातील स्त्रियांची भूमीका याचा विचार केल्यास ७५ टक्के स्त्रिया हया शेतीची कामे करतात. म्हणजेच आपल्याला असे म्हणता येईल की, एकंदरित येथील लोकांचे जिवन शेतीवर अवलंबून आहे. त्यामूळे स्त्रिया सुध्दा शेतात किंवा विविध प्रकारचे कार्य करून आपल्याला शेतीतील योगदानाची जाणीव करून देतात. व इतरवेळी

मोलमजूरीची कामे करतात. त्यामूळे स्त्रियांसुध्दा शेतीव्यवसाय प्रगती करून कृषी व्यवसायातील उत्पादन वाढवू शकतात. या दृष्टिकोनातून या लघूशोध निबंधात प्रयत्न केलेला आहे.

कृषी भूगोल म्हणजे भौगोलिक दृष्टिकोनातून केला जाणारा कृषीचा अभ्यास होय.

## कृषी भूगोल म्हणजे काय?

"जमिन नांगरून तिच्यात बि–बियाणे पेरणे आणि पेरलेल्या बियांची व त्याच्या रोपांची काळजी घेऊन त्याच्यापासून धान्य मिळवणे म्हणजे शेती होय"

मनुष्यबळ, पाणी, अवजारे, यंत्रे त्यांच्या सहाय्याने जमिन कसून पिके काढणे यालाच शेती (कृषी) असे म्हणतात.

## १.२) लघूशोध निबंधाचा उद्‌देश :–

प्रस्तूत संशोधन पत्रिकेचा उद्‌देश खालीलप्रमाणे –

१) पवनी तालूक्यातील कृषी विकासात स्त्रियांची भूमीका यांचा अभ्यास करणे.

२) ग्रामिण भागातील वाढत्या लोकसंख्येच्या आवश्यक गरजा लक्षात घेऊन त्या पूर्ण करण्याचे साधन शेतीचे महत्व आणि त्यात स्त्रियांची भूमीका यांचे महत्व किती आहे हे पाहणे.

३) पवनी तालूक्यातील रोजगारामध्ये कृषी उत्पादनात स्त्रियांच्या सहकार्याचे महत्व विशद करणे.

## १.३) अभ्यास पद्धती :—

भूगोल विषयाच्या अंतर्गत कोणत्याही एका विशिष्ट प्रदेशाचा अभ्यास करण्याकरिता सांख्यिकिय माहितीला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. त्याप्रदेशाचे अभ्यास करण्यासाठी घेतलेली आकडेवारी ही पंचायत समिती, तहसिल कार्यालय, यांचे सहकार्याने प्राप्त होते. घेतलेली आकडेवारी जवळपास १–२ वर्षाची घेतल्यास त्याचा योग्य प्रकारे अभ्यास करता येत नाही. म्हणून अभ्यास करण्यासाठी मागील ५–६ वर्षाचे आकडे विचारात घ्यावे लागते. प्रस्तूत लघूशोध निंबधाकरिता माहिती मिळवत असतांना सामाजिक व आर्थिक समालोचन २०१८–२०१९ या कालावधीतील आकडे घेऊन त्याची सरासरी घेऊन अभ्यास करण्याचा अल्पसा प्रयत्न केलेला आहे.

प्रस्तूत लघूशोध निंबध कृषी विकासातील स्त्रियांची भूमीका दाखविण्यासाठी चिन्हे, नकाशे, आराखडे, आकडे व आकृत्यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

## १.४) संशोधनातील साधने :—

संशोधन कर्त्याने निवडलेल्या नमुन्याचा अभ्यासात कोणते यंत्र व साधनांचा वापर करणार आहे तसेच नमून्यातून प्राप्त माहितीचे तो विश्लेषण कसे करणार आहे हे संशोधन कर्त्याने ठरवून घ्यावे लागते. संशोधनाच्या विवेचनावरून लक्षात येते की, संशोधनाचा आराखडा तयार करणे म्हणजे योजनेचा आराखडा होय.

### १) कार्यालयीन माहिती :—

हा अभ्यास शासकिय तसेच कार्यालयीन प्राप्त आकडयावर आधारित आहे. यासाठी सांख्यिकिय कार्यालयीन आकडे, नकाशे, आराखडे, माहिती

प्रकरण दूसरे

# पवनी तालूक्याची भौगोलिक पार्श्वभूमी

# प्रकरण दूसरे

## पवनी तालूक्याची भौगोलिक पार्श्वभूमी

कोणत्याही क्षेत्राचा अभ्यास करतांना त्या क्षेत्राची भौगोलिक परिस्थिती कशाप्रकारची आहे याचा अभ्यास आवश्यक आहे. त्या क्षेत्राचे स्थान हवामान, प्राकृतिक रचना, जलप्रवाह प्रणाली इत्यादी नैसर्गिक घटकांचा अभ्यास करून त्या क्षेत्रातील विशिष्ट घटकांचा अभ्यास केला जातो.

### २.१) स्थान व विस्तार :—

भंडारा जिल्हयातील पवनी हा तालूका आहे पवनी तालूक्याचे क्षेत्रफळ ७२,३९० हेक्टर म्हणजेच ६२० चौ.कि.मी. आहे. पवनी तालूक्याचा अक्षांश व रेखांश विस्तार १०° ४' त २०° ५' उत्तर अक्षाश व ७८° ५' ते ८०° ६' पुर्व रेखांश आहे. पवनी तालूक्यात ११७ गावे आहेत. त्यापैकी कोंढा व अड्याळ हे मूख्य गाव आहे.

### २.२) भूमी स्वरूप :—

पवनी तालूक्यामध्ये विविध भु—स्वरूप आहेत. सोबत जोडलेल्या नकाशाचे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, ४५० ते ६०० मी. उंचीचा डोंगराळ भाग म्हणजे नेरला टेकडीचा डोंगर आढळतो. उंचीचा प्रदेश तुलनात्मकदृष्टया सपाट व सुपीक असलो आढळून येतो. त्याचकारणाने तेथे शेती हा प्रमूख व्यवसाय आहे.

### २.३) नदि प्रणाली :—


पवनी तालूक्यात मुख्य आणि सर्वात मोठा गोसे धरण आहे या तालूक्यामध्ये गोसे धरणद्वारे जलसिंचन केले जाते. तसेच या तालूक्यात वैनगंगा या नदी आहे.

# भारतातील महाराष्ट्राचे स्थान






# पवनी तालुक्याचे स्थान



# गोसे धरण व वैनगंगा नदीचे स्थान



## २.४) मृदा :—

पवनी तालूक्याच्या वैनगंगा नदीच्या भागात काही माती दिसून येते. तसेच काही भागामध्ये तांबडी माती बऱ्याच प्रमाणात आढळते. काही भागामध्ये लाल रंगाची माती तर काही भागामध्ये पहाडी स्वरूपाची माती आढळून येते.



## २.५) हवामान :—

भारत हा उष्णकटिबंधीय हवामानाचा प्रदेश आहे. आणि या जिल्हयातील हवामान उष्ण व कोरडे आहे.

पवनी तालूक्यामध्ये तापमान एप्रील आणि मे महिन्यात जास्त असते. तर डिसेंबर व जानेवारी या दोन्ही महिन्यात कडाक्याची थंडी असते.

### अ) तापमान:—

हवामानाचा अभ्यास करतांना हा महत्वाचा भौतिक घटक आहे. तापमानाचा परिणाम या प्रदेशात उत्पादित होणाऱ्या कृषी मालावर होत असतो. व येथील मुख्यत्वे तांदूळ पिकावर या तापमानाचा परिणाम झालेला दिसून येतो. सिंदेवाही तालूक्यातील तापमान ४७,२.८ॅ पर्यत आढळते हिवाळयात तापमान १२,२.८ॅ इतके आढळते. या तालूक्यातील हवामान विषम स्वरूपात असून कोपेन या वर्गीकरणावरून२/४ प्रकारचा आढळते सिंदेवाही तालूक्यात वनसंपदा असल्याने भूजल पातळीला संरक्षण मिळालेले आहे. कारण वनस्पतीमूळे बाष्पोत्सर्जनाची क्रिया कमी प्रमाणात आढळून येते.

## २.५) हवामान :—

भारत हा उष्णकटिबंधीय हवामानाचा प्रदेश आहे. आणि या जिल्हयातील हवामान उष्ण व कोरडे आहे.

पवनी तालूक्यामध्ये तापमान एप्रील आणि मे महिन्यात जास्त असते. तर डिसेंबर व जानेवारी या दोन्ही महिन्यात कडाक्याची थंडी असते.

### अ) तापमान:—

हवामानाचा अभ्यास करतांना हा महत्वाचा भौतिक घटक आहे. तापमानाचा परिणाम या प्रदेशात उत्पादित होणाऱ्या कृषी मालावर होत असतो. व येथील मुख्यत्वे तांदूळ पिकावर या तापमानाचा परिणाम झालेला दिसून येतो. सिंदेवाही तालूक्यातील तापमान ४७,२.८ॅ पर्यत आढळते हिवाळयात तापमान १२,२.८ॅ इतके आढळते. या तालूक्यातील हवामान विषम स्वरूपात असून कोपेन या वर्गीकरणावरून२/४ प्रकारचा आढळते सिंदेवाही तालूक्यात वनसंपदा असल्याने भूजल पातळीला संरक्षण मिळालेले आहे. कारण वनस्पतीमूळे बाष्पोत्सर्जनाची क्रिया कमी प्रमाणात आढळून येते.


# पवनी तालूक्यातील तापमान २०१९

## ( तापमान अंश सेल्सीयस मध्ये )

| अ. क्र | महिने | कमाल तापमान | किमान तापमान | सरासरी |
|---|---|---|---|---|
| १ | जानेवारी | ३४.५ | १२.२ | २३.९ |
| २ | फेब्रूवारी | ३६.८ | ११.२ | २४.१० |
| ३ | मार्च | ३९.६ | १७.५ | २९.२० |
| ४ | एप्रील | ४४.८ | ५.३ | ३१.६० |
| ५ | मे | ४६.४ | २५.७ | ३४.१० |
| ६ | जून | ४६.३ | २४.९ | ३५.२० |
| ७ | जूलै | ३७.९ | २२.८ | ३०.७० |
| ८ | ऑगष्ट | ३५.२ | २४.२ | ३९.८५ |
| ९ | सप्टेंबर | ३४.८ | २३.२ | २८.७० |
| १० | आक्टोंबर | ३५.९ | १६.८ | २६.१० |
| ११ | नोव्हेंबर | ३३.७ | १३.२ | २३.६० |
| १२ | डिसेंबर | ३६.२ | १०.७ | २३.१५ |

# पवनी तालूक्यातील तापमान २०१९

## ( तापमान अंश सेल्सीयस मध्ये )



ब) पर्जन्य :—

हवामानाच्या प्रकारात तापमानाइतकेच पर्जन्याला महत्व आहे. सिंदेवाही तालूका हा पर्जन्याच्या दृष्टिने नेऋत्य मोसमी वाऱ्यावर अवलंबून आहे. या तालूक्याची सरासरी पर्जन्यमान १३३८.८ मी.मी. आहे. साधारणपणे जून ते सप्टेंबर महिन्यापर्यंत पाऊस पडतो व सर्वात जास्त पाऊस जूलै महिन्यात पडतो.


**पवनी तालूक्यातील पर्जन्य २०१९**

**( पर्जन्य मी.मी. मध्ये )**

| अ.क्र | महिने | पर्जन्य |
|---|---|---|
| १ | जानेवारी | — |
| २ | फेब्रूवारी | — |
| ३ | मार्च | — |
| ४ | एप्रील | — |
| ५ | मे | — |
| ६ | जून | २१०.५ |
| ७ | जूलै | ७८२.५ |
| ८ | ऑगष्ट | १७८.६ |
| ९ | सप्टेंबर | १६७.२ |
| १० | आक्टोंबर | — |
| ११ | नोव्हेंबर | — |
| १२ | डिसेंबर | — |

## पवनी तालूक्यातील पर्जन्य २०१९

### ( पर्जन्य मी.मी. मध्ये )



## पवनी तालूक्यातील भूमी उपयोजन:–

भूमी उपयोजन हा त्या प्रदेशातील तांदूळ पिक प्रक्रियेला निर्धारित करित असते व तांदूळ पिक कसे आहे ते ठरविले जाते. योग्य भूमी उपयोग झाल्यास त्या प्रदेशाची आर्थिक उन्नती होण्यास मदत होते. म्हणजे भूमी आर्थिक उन्नतीचे उद्योजक आहे. *( कृषी भूगोल )*

**भूमी उपयोगाचा अर्थ :–**

भूमी उपययोजनासाठी अनेक विचारवंतानी व्याख्या केलेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे –

**१) डॉ. डी. एस. चव्हान :–**

" भूमी उपयोजन एक दिर्घकालीन प्रक्रिया आहे. "

**२) सी बर्नजेटी :–**

" भूमी उपयोग प्राकृतिक तसेच सांस्कृतिक घटकाच्या संयोगाचे प्रतिक आहे."

*आधार :– ( कृषी भूगोल – सुरेश फुले )*

वरिल व्याख्येनूसार स्पष्ट होत आहे की, भूमीच्या वेगवेगळया घटकांसाठी मानवाने केलेला वापर म्हणजे भूमी उपयोजन होय.

भूमी उपयोगाचे प्रकार :—

१) जंगलव्याप्त क्षेत्र

२) शेतीलायक नसलेले क्षेत्र

३) पडीत जमिनी व्यतिरिक्त लागवड नसलेले क्षेत्र.

४) एकूण पडीत जमिन.

५) लागवडीखालील एकूण क्षेत्र.

६) एकूण भौगोलिक क्षेत्र.


## पवनी तालूक्यातील भूमी उपयोग

## (क्षेत्र हेक्टरमध्ये २०१५—२०१६ ते २०१८—२०१९)

| अ.क्र | भूमी उपयोग प्रकार | २०१५—२०१६ | | २०१८—२०१९ | |
|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | शे. प्र. | क्षेत्र | शे. प्र. |
| १ | जंगलव्याप्त क्षेत्र | २६.९७२ | ३६.३३ | २६६९७ | ३५.९६ |
| २ | शेतीलायक नसलेले क्षेत्र | ७.३४२ | ९.८९ | ७२२५ | ९.७३ |
| ३ | पडीत जमिनीव्यतिरिक्त लागवड नसलेल क्षेत्र | १.०७० | १.४४ | ९९० | १.३३ |
| ४ | एकूण पडित जमिन | १४.९७० | २०.१६ | १४९८५ | २०.१८ |
| ५ | लागवडीखालील एकूण क्षेत्र | २३.८७८ | ३२.१६ | २४३६५ | ३२.७८ |
| ६ | एकूण भौगोलिक क्षेत्र | ७४.२३२ | ९९.९८ | ७४२३२ | ९९.९८ |


## पवनी तालूक्यातील भूमी उपयोग

## (क्षेत्र हेक्टरमध्ये २०१५—२०१६)




## पवनी तालूक्यातील भूमी उपयोग

## (क्षेत्र हेक्टरमध्ये २०१८—२०१९)



# संदर्भग्रंथ सुची


१. कृषी भूगोल — डॉ. सुरेश फुले

२. भंडारा जिल्हा भूगोल — वर्ग ३ रा

३. सांख्यिकीय आकडेवारी विभाग — पंचायत समिती पवनी

४. भारताचा कृषी भूगोल — प्रा. विठ्ठल घारपूरे

५. सामाजिक व आर्थिक समालोचन—भूगोल विभाग डॉ. अरुण मोटघरे महाविद्यालय कोंढा कोसरा